# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील अरुंद रस्त्यावरील जुन्या दाट व
**{सार्व.आ.अभि.विभाग}** स्लम वसाहतीमधील मलवाहिन्या व चेंबरची सफाई करण्याकरीता अत्याधुनिक दोन लहान सक्शन कम जेटींग रिसायकल मशीनचे संच ७ वर्षांकरीता भाडेतत्वावर घेण्याबाबत तसेच प्रथम वर्षानंतर ४ टक्के वार्षिक वाढ प्रति वर्ष देण्याचे प्रस्तावित आहे. याकरीता अंदाजे ७ वर्षाकरीता एकूण रु. १२,२३,०४,०००/- (रु. बारा कोटी तेवीस लक्ष चार हजार फक्त) रक्कमेची आवश्यकता असेल. सदरील काम पद क्र. A४३४०११७१६०२ अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब, रु. १२,२३,०४,०००/- राशीस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून निम्नतम दर प्राप्त करुन सदरील दोन संच भाडेतत्वावर घेण्याचा तसेच भविष्यात देखील आवश्यकता भासल्यास आणखी दोन संच भाडेतत्वावर घेण्याचा व या कामाचा खर्च पद क्र. A४३४०११७१६०२ अंतर्गत भागविण्याचा व निविदा मागविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :

१. प्रस्तावित काम हे पद क्र. A४३४०११७१६०२ (मशीनरी खरेदी / मशीनरी भाडेतत्वावर घेणे) अंतर्गत प्रस्तावित असून सदरहू कामास सन २०२२-२३ या आर्थिक वर्षांत सदर पदा अंतर्गत राशी रु. ३,५०,००,०००/- चे प्रावधान प्राप्त आहे. प्रतिवर्ष सदरील कामाकरीता टप्प्याटप्प्याने प्रावधान नोंदविण्यात येईल.
२. सविस्तर टिप्पणी नस्तीत आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 158/**मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 28/11/2022

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील अरुंद रस्त्यावरील जुन्या दाट व स्लम वसाहतीमधील मलवाहिन्या व चेंबरची सफाई करण्याकरीता अत्याधुनिक दोन लहान सक्शन कम जेटींग रिसायकल मशीनचे संच ७ वर्षांकरीता भाडेतत्वावर घेण्याबाबत तसेच प्रथम वर्षानंतर ४ टक्के वार्षिक वाढ प्रति वर्ष देण्याचे प्रस्तावित आहे. याकरीता अंदाजे ७ वर्षाकरीता एकूण रु. १२,२३,०४,०००/- (रु. बारा कोटी तेवीस लक्ष चार हजार फक्त) रक्कमेची आवश्यकता असेल. सदरील काम पद क्र. A४३४०११७१६०२ अंतर्गत प्रस्तावित आहे.

सबब, रु. १२,२३,०४,०००/- राशीस प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून निम्नतम दर प्राप्त करुन सदरील दोन संच भाडेतत्वावर घेण्याचा तसेच भविष्यात देखील आवश्यकता भासल्यास आणखी दोन संच भाडेतत्वावर घेण्याचा व या कामाचा खर्च पद क्र. A४३४०११७१६०२ अंतर्गत भागविण्याचा व निविदा मागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**